# प्रकरण ९ लष्करातील सेवा संधी

लष्करातील सेवा ही देशाकरिता अत्यंत महत्त्वाची, प्रामाणिकपणाची आणि समाधानकारक अनुभव देणारी आहे. लष्करात भरती होण्यासाठी ढोबळपणे तीन टप्पे आहेत.

१) १० वी (SSC) परीक्षा पास झाल्यानंतर

२) १२ वी (HSC) परीक्षा पास झाल्यानंतर

३) मान्यता प्राप्त विद्यापीठातून पदवी प्राप्त केल्यानंतर

## लष्करी सेवेत भरती स्तर

लष्करात भरती होण्यासाठी आपल्या पात्रतेनुसार विविध स्तर आहेत. ते पुढीलप्रमाणे -

**(१) प्रथम श्रेणी वर्ग - १ - सनदी अधिकारी**

**(२) द्‌वितीय श्रेणी वर्ग - २ - किंवा ब गट (सनदी अधिकारी)**

**(३) तृतीय श्रेणी वर्ग - २ - किंवा ब गट (बिनसनदी अधिकारी)**

**(४) चतुर्थ श्रेणी - वर्ग - ३ - किंवा क गट**

**(५) पंचम श्रेणी - किंवा ड वर्ग यात कुशल किंवा अर्ध कुशल कामगारांची भरती केली जाते.**

## लष्करातील भरतीचे मूलभूत घटक

- **वयोमर्यादा - नियमात दर्शवल्याप्रमाणे**
- **शारीरिक पात्रता - नियमानुसार किमान उंची, वजन, छाती**
- **वैद्यकीय पात्रता - नियमानुसार**
- **शैक्षणिक पात्रता - नियमानुसार**

## लष्करी व निम लष्करी दलात महिलांना संधी

- **सैन्यदल :** विद्यापीठातून पदवी प्राप्त केल्यानंतर प्रथम वर्ग सनदी अधिकारी म्हणून महिलांना सैन्यदलात सनदी अधिकारी हुद्‌द्यावर जाता येते.
- **निम लष्करी दल :** CRPF, BSF व ITBP यात अधिकारी गट आणि त्या खालील गटात महिलांसाठी संधी उपलब्ध आहेत.

## अर्ज करण्याच्या पद्धती

लष्करातील विविध स्तरांवर व विविध सेवांसाठी अर्ज करण्यासाठी विविध संकेतस्थळे दिलेली आहेत. त्यांचा उपयोग करावा. काही संकेतस्थळे पुढीलप्रमाणे –

| | |
|---|---|
| (१) स्थलसेना | – http://www.joinindianarmy.nic.in |
| (२) नौसेना | – http://www.joinindiannavy.gov.in |
| (३) हवाईसेना | – http://www.careerairforce.nic.in |
| | – http://airmenselection.in |
| (४) सीमा सुरक्षा दल | – http://bsf.nic.in |
| (५) केंद्रीय राखीव पोलीस दल | – http://crpfindia.com |
| (६) इंडो तिबेट सीमा पोलीस | – http://recruitmentitbpolice.nic.in |
| (७) सशस्त्र सीमा दल | – http://www.ssb.nic.in |
| (८) केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल | – http://www.cisf.gov.in |
| (९) आसाम रायफल्स | – http://www.assamrifles.gov.in |

याशिवाय आठवड्याच्या Employment News वर्तमानपत्रातून माहिती मिळवा.

7Y32B9






किशोर
कथा, कविता, कादंबरीका, एकांकिका,
दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र,
विज्ञान, देश-देशांतर, लोककथा
लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर
मासिकातील चाळीस वर्षांतील
निवडक साहित्यांवर आधारित
'निवडक किशोर'चे १४ खंड
किंमत प्रत्येकी
₹१६३/-
(३0% सूट)
वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी
उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूम किंमत ₹ १६००/-
किशोर
वरील खंडांच्या खरेदीसाठी मंडळाच्या पुढील विभागीय भांडारांशी संपर्क साधा.
पुणे (०२०- २५६५९४६५), मुंबई (गोरेगाव) (०२२-२८७७१८४२), औरंगाबाद (०२४०- २३३२१७१),
नागपूर (०७१२-२५२३०७८/ २५४७७१६), नाशिक (०२५३- २३९१५११), लातूर (०२३८२- २२०९३०),
कोल्हापूर (०२३०- २४६८५७६), अमरावती (०७२१-२५३०९६५), पनवेल (०२२- २७४६२६४५)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी संरक्षणशास्त्र (कार्यपुस्तिका) इयत्ता नववी

₹ ३८.००

